महाराष्ट्र शासन

**विधि व न्याय विभाग**

**सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३**

# महाराष्ट्र कामगारांचा किमान घरभाडे भत्ता अधिनियम, १९८३

(दिनांक १५ ऑगस्ट, २०१३ पर्यंत सुधारित)

**Maharashtra Act No. XXIII of 1988**

# The Maharashtra Workmen's Minimum House-rent Allowance Act, 1983

*(As modified upto 15th August, 2013)*

*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, कोल्हापूर यांच्याकडून भारतात मुद्रित आणि संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००४ यांच्याकडून प्रकाशित.

२०१३

[किंमत रु. ९-००]

# महाराष्ट्र कामगारांचा किमान घरभाडे भत्ता अधिनियम, १९८३

## अनुक्रमणिका

**उद्देशिका.**


| **कलमे.** | | | | | **पृष्ठ** |
|---|---|---|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव, व्याप्ती, प्रारंभ व प्रयुक्ति. | .. | .. | .. | १ |
| २. | व्याख्या. | .. | .. | .. | १ |
| ३. | नियंत्रक प्राधिकाऱ्याची नियुक्ती. | .. | .. | .. | ३ |
| ४. | घरभाडे भत्ता देण्याची जबाबदारी. | .. | .. | .. | ३ |
| ५. | घरभाडे भत्ता केव्हा प्रदेय नसेल. | .. | .. | .. | ४ |
| ६. | दंड म्हणून घरभाडे भत्त्याची वसुली. | .. | .. | .. | ४ |
| ७. | या अधिनियमाखालील विवादाचा संदर्भ. | .. | .. | .. | ५ |
| ८. | नोंदवह्या, लेखे व अभिलेख ठेवणे. | .. | .. | .. | ५ |
| ९. | निरीक्षकांची नियुक्ती. | .. | .. | .. | ५ |
| १०. | अपराधांबद्दल शास्ती. | .. | .. | .. | ६ |
| ११. | अपराधांची दखल घेणे. | .. | .. | .. | ७ |
| १२. | अधिनियमाखाली केलेल्या कृतीला संरक्षण. | .. | .. | .. | ७ |
| १३. | विशेष प्रकरणांत सूट देण्याचा अधिकार. | .. | .. | .. | ७ |
| १४. | नियम करण्याचा अधिकार. | .. | .. | .. | ७ |
| १५. | इतर कायदे किंवा करार यांखालील अधिकारांचे संरक्षण. | | .. | .. | ८ |

# सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३[१]

## [महाराष्ट्र कामगारांचा किमान घरभाडे भत्ता अधिनियम, १९८३.]

[या अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक ५ ऑक्टोबर, १९८८ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे, सर्व लोकांच्या माहितीसाठी **महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग पाच, असाधारण** यात दिनांक १७ ऑक्टोबर, १९८८ रोजी प्रथम प्रसिद्ध करण्यात येत आहे.]

या अधिनियमात पुढील अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आल्या :--

सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४.

महाराष्ट्रातील उद्योगांमध्ये नोकरीस असलेल्या कामगारांना किमान घरभाडे भत्ता देण्याकरिता तरतूद करण्यासाठी अधिनियम.

**ज्याअर्थी,** महाराष्ट्रातील उद्योगांमध्ये नोकरीस असलेल्या कामगारांना किमान घरभाडे भत्ता देण्याकरता तरतूद करणे आणि त्याच्याशी संबंधित बाबींसाठी तरतूद करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौतिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :--

संक्षिप्त नाव, व्याप्ती, प्रारंभ व प्रयुक्ति.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र कामगारांचा किमान घरभाडे भत्ता अधिनियम, १९८३ असे म्हणता येईल.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्याला लागू असेल.

(३) तो, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमून देईल अशा तारखेला किंवा तारखांना अंमलात येईल आणि शासनास योग्य वाटेल त्यानुसार वेगवेगळ्या उद्योगांसाठी किंवा उद्योगांच्या गटांसाठी किंवा राज्यातील वेगवेगळ्या प्रदेशांसाठी वेगवेगळ्या तारखा नेमून देता येतील.

१९४७ चा १४. १९४७ चा मुंबई ११.

(४) ज्या कोणत्याही उद्योगातील कारखान्याच्या किंवा आस्थापनेच्या संबंधातील कोणत्याही औद्योगिक विवादाच्या बाबतीत राज्य शासन हे, औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ याच्या कलम २, खंड (क), उप-खंड (दोन) अन्वये समुचित शासन असेल, किंवा ज्याला मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम, १९४६ यांचे उपबंध लागू होत असतील आणि ज्या कारखान्यात किंवा आस्थापनेत पन्नास किंवा राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे त्यापेक्षा अधिक कामगार नोकरीस असतील अशा, पोट-कलम (३) अन्वये ज्याच्या संबंधात अधिसूचना काढण्यात आलेली आहे, अशा क्षेत्रातील उद्योगातील प्रत्येक कारखान्याला किंवा आस्थापनेला तो लागू असेल.

(५) पोट-कलमे (३) व (४) यात काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनास **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे तसे करण्याचा आपला उद्देश असल्यासंबंधीची दोन महिन्यांपेक्षा कमी नसेल इतक्या मुदतीची नोटीस देऊन, आणि त्याच्याकडे येतील असे कोणतेही आक्षेप व सूचना विचारात घेतल्यानंतर तशाच प्रकारच्या अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाचे उपबंध, ज्यामध्ये पन्नासपेक्षा कमी परंतु अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल इतक्या कामगारांच्या संख्येपेक्षा कमी नसतील इतके कामगार नोकरीत आहेत अशा, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कोणत्याही एका किंवा अनेक उद्योगांतील कोणत्याही कारखान्यास किंवा आस्थापनेस विनिर्दिष्ट तारखेपासून लागू करता येतील.

---

१. उद्देश व कारणे यांच्या निवेदनाकरिता महाराष्ट्र शासन राजपत्र, १९८८, भाग पाच, असाधारण, इं. पृष्ठ ४०४ पाहा.

(६) एकदा या अधिनियमाच्या तरतुदी या कलमान्वये कोणत्याही उद्योगातील कोणत्याही कारखान्याला किंवा आस्थापनेला लागू झाल्यानंतर किंवा लागू करण्यात आल्यानंतर त्या, अशा कारखान्यातील किंवा आस्थापनेतील कामगारांची संख्या यथास्थिति, पन्नासपेक्षा किंवा पोट-कलमे (४) किंवा (५) अन्वये काढलेल्या अधिसूचनेअन्वये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कामगारांच्या अधिक किंवा कमी संख्येपेक्षा कमी झालेली असेल तरीही, त्या कारखान्याला किंवा आस्थापनेला लागू असण्याचे चालू राहील.

**स्पष्टीकरण.--**या कलमाच्या प्रयोजनांसाठी कोणत्याही उद्योगात नोकरीत असलेल्या कामगारांची संख्या मोजण्याकरिता, महाराष्ट्र राज्यातील उद्योगांमधील कारखान्यांच्या व आस्थापनांच्या सर्व शाखांमध्ये व युनिटांमध्ये नोकरीस असलेल्या कामगारांची संख्या विचारात घेण्यात येईल, आणि त्याबाबतीत कोणतीही शंका किंवा विवाद निर्माण झाल्यास ती बाब राज्य शासनाकडे किंवा त्याने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे विचारार्थ पाठवण्यात येईल आणि राज्य शासन किंवा तो अधिकारी त्यावर निर्णय देईल आणि यथास्थिति, राज्य शासनाचा किंवा त्या अधिकाऱ्याचा निर्णय अंतिम असेल.

व्याख्या. **२.** संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात,—

(अ) "नियंत्रक प्राधिकारी" म्हणजे, कलम ३ अन्वये राज्य शासनाने नेमलेला प्राधिकारी ;

(ब) कोणत्याही उद्योगातील कोणत्याही कारखान्याच्या किंवा आस्थापनेच्या संबंधात "नियोक्ता" म्हणजे जिचे/ज्याचे उद्योगाच्या कामकाजावर अंतिम नियंत्रण आहे अशी व्यक्ती किंवा असा प्राधिकारी, आणि त्यामध्ये, त्यात नोकरीस असलेल्या कामगारांवर देखरेख ठेवणे व नियंत्रण करणे यासाठी जो मालकाला जबाबदार असेल अशा व्यवस्थापकाचा, व्यवस्थापन संचालकाचा किंवा (कोणत्याही पदनामाने संबोधल्या जाणाऱ्या) कोणत्याही अन्य व्यक्तीचा समावेश होतो;

(क) "आस्थापना" म्हणजे 'मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम, १९४८' यात व्याख्या केल्याप्रमाणे असलेली आस्थापना ; १९४८ चा मुंबई ७९.

(ड) "कारखाना" म्हणजे 'कारखाना अधिनियम, १९४८' मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेला कारखाना ; १९४८ चा ६३.

(ई) "उद्योग" म्हणजे 'औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७' मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेला उद्योग ; १९४७ चा १४.

(फ) "महिना" म्हणजे 'मुंबई सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १९०४' मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेला महिना ; १९०४ चा मुंबई १.

(ग) "विहित" म्हणजे या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित ;

(ह) "वेतन" म्हणजे मूळ वेतन व महागाई भत्ता ;

(आय) "कामगार" म्हणजे प्रकरणपरत्वे आवश्यक असल्याप्रमाणे 'औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७' यात व्याख्या केलेला कामगार किंवा मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम, १९४६ यात व्याख्या केलेला कर्मचारी ; १९४७ चा १४. १९४७ चा मुंबई ११.

१९४७ चा १४. १९४७ चा मुंबई ११. (जे) या अधिनियमात वापरण्यात आलेले परंतु व्याख्या करण्यात न आलेले शब्द व शब्दप्रयोग यांचा अर्थ हा, प्रकरणपरत्वे आवश्यक असल्याप्रमाणे 'औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७' किंवा 'मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम, १९४६' यांत त्यांना नेमून दिलेल्या अर्थाप्रमाणेच असेल.

**३.** राज्य शासनाला, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या प्रशासनासाठी आणि या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी सहायक कामगार आयुक्तापेक्षा कमी दर्जाच्या नसलेल्या अधिकाऱ्याची नियंत्रक प्राधिकारी म्हणून नियुक्ती करता येईल आणि निरनिराळ्या क्षेत्रांसाठी अथवा निरनिराळ्या उद्योगांसाठी अथवा त्याच क्षेत्रात निरनिराळ्या उद्योगांसाठी किंवा निरनिराळ्या क्षेत्रांमध्ये त्याच उद्योगासाठी निरनिराळ्या नियंत्रक प्राधिकाऱ्यांची नियुक्ती करता येईल. नियंत्रक प्राधिकाऱ्याची नियुक्ती.

**४.** (१) प्रत्येक नियोक्ता, त्याने कामावर लावलेल्या प्रत्येक कामगाराला घरभाडे भत्ता देईल. हा भत्ता कामगाराला त्याच्या महिन्याभरातील सेवांसाठी प्रदेय असलेल्या वेतनाच्या पाच टक्क्यांपेक्षा कमी नसेल इतकी रक्कम किंवा वीस रुपये यांपैकी जे जास्त असेल, तितका असेल : घरभाडे भत्ता देण्याची जबाबदारी.

परंतु, कामगार जेव्हा एका महिन्यापेक्षा कमी दिवस सेवेत असेल तेव्हा त्याला तो यथाप्रमाण प्रदेय असेल :

आणखी असे की, महिन्याच्या सेवेत पुढील दिवसांचा समावेश असेल :--

१९४६ चा २०. १९४७ चा १४. १९४७ चा मुंबई ११. (अ) एखाद्या कराराखाली किंवा 'औद्योगिक सेवायोजन (स्थायी आदेश) अधिनियम, १९४६' याखालील स्थायी आदेशाद्वारे अनुज्ञेय असल्याप्रमाणे किंवा 'औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७' अथवा 'मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम, १९४६' याखाली अथवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याखाली कामगाराला जेवढ्या दिवसांसाठी कामबंदी करण्यात आली असेल तेवढे दिवस;

(ब) ज्या कामासाठी नियोक्ता वेतन देतो ते काम तो करण्यास टाळेबंदीमुळे किंवा काम थांबल्यामुळे जेवढे दिवस असमर्थ असेल तेवढे दिवस;

(क) त्याच्या कामधंद्यामुळे आणि तो कामधंदा करीत असताना झालेल्या अपघातामुळे तात्पुरती असमर्थता येऊन जेवढे दिवस तो अनुपस्थित राहिला असेल तेवढे दिवस;

(ड) तो साप्ताहिक अथवा जाहीर केलेली इतर सुटी, रुग्णता रजा अथवा अनुज्ञेय नैमित्तिक अथवा वैकल्पिक रजा यांसह कोणत्याही प्राधिकृत रजेवर असेल तेवढे दिवस;

(ई) तो कोणत्याही प्रकारच्या पगारी रजेवर असेल तेवढे दिवस;

(फ) स्त्री कामगाराच्या बाबतीत, ती प्रसूति रजेवर असेल तेवढे दिवस, मात्र रुग्णता रजा, साप्ताहिक सुट्या इत्यादी धरुन अशा रजेचा एकूण कालावधी बारा आठवड्यांपेक्षा अधिक असणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये कामगाराला प्रदेय असलेला घरभाडे भत्ता [१][त्याच्या मासिक वेतनाबरोबर कामगाराच्या नावावर त्याच्या खात्यात रक्कम देय असलेला धनादेश काढून त्याद्वारे किंवा कामगाराच्या बँक खात्यात ती रक्कम जमा करुन त्याद्वारे] देण्यात येईल.

---

१. सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम २ द्वारे "त्याच्या मासिक वेतनाबरोबर रोख रकमेत" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(३) पोट-कलम (१) मध्ये कोणतीही गोष्ट अंतर्भूत असली तरी, जो कामगार, त्याच्या सेवेच्या अटींअन्वये किंवा कोणताही करार, समझोता किंवा निवाडा याअन्वये पोट-कलम (१) मध्ये उपबंधित केलेल्यापेक्षा अधिक दराने घरभाडे भत्ता मिळण्यास पात्र असेल त्याला अशा अधिक दराने तो मिळणे चालू राहील.

(४) एखाद्या कामगाराला नियोक्त्याने राहती जागा दिली असेल आणि त्यासाठी त्याच्या वेतनातून रक्कम कापून घेण्यात येत असेल त्या बाबतीत—

(अ) जर अशा जागेसाठी कापून घेण्यात आलेली रक्कम पोट-कलम (१) अन्वये अनुज्ञेय असलेल्या घरभाडे भत्त्याच्या रकमेपेक्षा अधिक असेल तर अशी कपातीची रक्कम त्या पोट-कलमात उल्लेखिलेल्या रकमेपर्यंत कमी करण्यात येईल आणि अशा कामगाराला घरभाडे भत्ता प्रदेय असणार नाही ; आणि

(ब) जर कापून घेण्यात आलेली रक्कम पोट-कलम (१) अन्वये अनुज्ञेय असलेल्या घरभाडे भत्त्यापेक्षा कमी असेल तर उक्त भत्ता कापून घेण्यात आलेल्या रकमेइतका कमी करण्यात येईल आणि उरलेली रक्कम कामगाराला देण्यात येईल.

घरभाडे भत्ता केव्हा प्रदेय नसेल.

**५.** जेथे एखाद्या कामगाराला नियोक्त्याने राहती जागा दिलेली असेल आणि त्याबद्दल त्याच्या वेतनातून रक्कम कापून घेण्यात येत नसेल त्या बाबतीत कलम ४ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे, नियोक्त्याने अशा कामगाराला घरभाडे भत्ता देणे आवश्यक असणार नाही.

दंड म्हणून घरभाडे भत्त्याची वसुली.

**६.** (१) या अधिनियमान्वये प्रदेय असलेला घरभाडे भत्ता नियोक्त्याकडून विहित मुदतीत देण्यात आला नसेल तर, कामगाराला किंवा या बाबतीत त्याने लेखी प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीला, अथवा तो मरण पावल्यास त्याच्या वारसाला किंवा वैध प्रतिनिधीला, वसुलीच्या इतर कोणत्याही पद्धतीस बाध न आणता, त्याला मिळणार असलेल्या घरभाडे भत्त्याची रक्कम नियोक्त्याकडून वसूल करण्यासाठी विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा रीतीने, अधिकारिता असलेल्या नियंत्रक प्राधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल :

परंतु, घरभाडे भत्ता देय झाल्यापासून एक वर्षाच्या मुदतीच्या आत असा अर्ज करावा लागेल :

आणखी असे की, वेळीच अर्ज न करण्यास कामगाराला पुरेसे कारण होते याबद्दल नियंत्रक प्राधिकाऱ्याची खात्री पटली असेल तर, एक वर्षाची उक्त मुदत संपल्यानंतरही असा अर्ज विचारात घेता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये नियंत्रक प्राधिकाऱ्याकडे अर्ज करण्यात आल्यानंतर त्याला, अर्जदारास व संबंधित नियोक्त्यास आपापले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर आणि आवश्यक वाटेल अशी आणखी चौकशी केल्यानंतर, अर्जदाराला देय असलेल्या घरभाडे भत्याची रक्कम निश्चित करता येईल आणि या अधिनियमान्वये अथवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये नियोक्त्याविरुध्द करावयाच्या इतर कोणत्याही कार्यवाहीस बाध न आणता, अशा रीतीने निश्चित केलेली घरभाडे भत्त्याची रक्कम अर्जदाराला देण्यासाठी आदेशाद्वारे निदेश देता येईल.

(३) नियंत्रक प्राधिकाऱ्याच्या, पोट-कलम (१) अन्वये केलेला कोणताही अर्ज खारीज करणाऱ्या किंवा पोट-कलम (२) अन्वये कोणताही निदेश देणाऱ्या, आदेशाविरुद्धचे अपील, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे या बाबतीत नेमील अशा, कामगार उप आयुक्तांच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अपील प्राधिकाऱ्यांकडे विहित रीतीने व विहित कालावधीत करता येईल आणि शासनास त्याच किंवा निरनिराळ्या उद्योगांसाठी किंवा त्याच किंवा निरनिराळ्या क्षेत्रांसाठी निरनिराळे अपील प्राधिकारी नेमता येतील.

(४) अपील प्राधिकाऱ्याकडे केलेल्या अपिलास अधीन राहून, या कलमान्वये नियंत्रक प्राधिकाऱ्याने दिलेला कोणताही आदेश, आणि अपील प्राधिकाऱ्याने अशा अपिलावर दिलेला कोणताही आदेश अंतिम असेल.

(५) घरभाडे भत्त्याची देय म्हणून आढळून आलेली आणि या कलमान्वये दिलेल्या व अंतिम ठरलेल्या कोणत्याही आदेशाद्वारे द्यावयाची कोणतीही रक्कम, या बाबतीत नियंत्रक प्राधिकारी ज्याच्याकडे अर्ज करील त्या न्याय दंडाधिकाऱ्याला, जणू काही त्याने तो बसवलेला दंड आहे असे समजून वसूल करता येईल आणि ती संबंधित अर्जदाराला किंवा यथास्थिति, त्याच्या वारसाला किंवा वैध प्रतिनिधीला देण्यात येईल.

१९४७ चा १४. १९४७ चा मुंबई ११.

या अधिनियमाखालील विवादाचा संदर्भ.

**७.** या अधिनियमान्वये प्रदेय असलेल्या घरभाडे भत्त्याच्या संबंधात अथवा कोणताही कारखाना किंवा कोणत्याही उद्योगातील आस्थापना किंवा तेथे कामावर असलेले कामगार यांना हा अधिनियम लागू होण्याच्या संबंधात एखादा नियोक्ता आणि एक किंवा अधिक कामगार यांच्यात कोणताही विवाद निर्माण होईल त्याबाबतीत, प्रकरणपरत्वे, आवश्यक असल्याप्रमाणे 'औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७' अथवा 'मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम, १९४६' यांच्या अर्थांतर्गत तो औद्योगिक विवाद असल्याचे समजण्यात येईल आणि अशा विवादाचे अन्वेषण करण्यासाठी अथवा त्याबाबत समझोता करण्यासाठी संबद्ध अधिनियमांतील तरतुदी योग्य त्या फेरफारांसाह लागू होतील.

नोंदवह्या, लेखे व अभिलेख ठेवणे.

**८.** या अधिनियमाच्या तरतुदी लागू होणारा प्रत्येक नियोक्ता, विहित करण्यात येतील अशा नोंदवह्या, लेखापुस्तके व अभिलेख ठेवील. त्यामध्ये तो, त्याने कामावर लावलेल्या कामगारांचे वेतन, त्यांना दिले जाणारे घरभाडे व त्यांनी दिलेल्या पावत्या हा, आणि इतर विहित तपशील विहित नमुन्यात व विहित रीतीने ठेवील.

निरीक्षकांची नियुक्ती.

**९.** (१) राज्य शासनास, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, त्याला योग्य वाटेल अशा व्यक्तींची निरीक्षक म्हणून नेमणूक करता येईल आणि संबंधित नियंत्रक प्राधिकाऱ्याच्या देखरेखीखाली ते आपली कामे ज्या स्थानिक हद्दीमध्ये करतील त्या हद्दी ठरवून देता येतील.

(२) या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींचे अनुपालन होत आहे किंवा नाही याची खात्री करणाऱ्या प्रयोजनासाठी निरीक्षकास, त्याला ज्या स्थानिक हद्दीमध्ये नेमले असेल त्या हद्दीमध्ये,—

(अ) शासनाच्या किंवा कोणत्याही स्थानिक किंवा इतर सार्वजनिक प्राधिकरणाच्या सेवेत असणाऱ्या व्यक्तींपैकी त्याला योग्य वाटेल अशा सहायकांसह (कोणतेही असल्यास) सर्व वाजवी वेळी, या अधिनियमान्वये किंवा तद्न्वये केलेल्या नियमांन्वये ठेवाव्या लागणाऱ्या कोणत्याही नोंदवह्या, लेखापुस्तके व इतर अभिलेख तपासण्यासाठी कोणत्याही उद्योगातील कारखान्याच्या किंवा आस्थापनेच्या कोणत्याही जागेत किंवा ठिकाणी प्रवेश करता येईल आणि तेथील, कोणत्याही प्रभारी व्यक्तीला, कोणत्याही नोंदवह्या, लेखापुस्तके किंवा कामगारांचे सेवायोजन व त्यांना दिले जाणारे वेतन आणि घरभाडे भत्ता यांच्याशी संबंधित इतर अभिलेख, तपासण्याकरिता आपल्यासमोर प्रस्तुत करण्यास फर्मावता येईल;

(ब) पूर्वोक्त प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनाशी संबद्ध अशा कोणत्याही बाबीवर, नियोक्त्याला त्याच्या अभिकर्त्याला किंवा सेवकाला किंवा कारखाना, आस्थापना किंवा अभिलेख यांचा प्रभार असणाऱ्या इतर कोणत्याही व्यक्तीला किंवा त्या कारखान्यात किंवा आस्थापनेत त्यावेळी किंवा पूर्वी कामगार असल्याचे मानण्यास निरीक्षकाला जिच्याबाबतीत कारण असेल अशा कोणत्याही व्यक्तीला प्रश्न विचारता येईल;

(क) कोणत्याही नियोक्त्याने किंवा अन्य व्यक्तीने जो अपराध केल्याचे त्याला सकारण वाटत असेल अशा, या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाशी त्याला संबद्ध वाटतील अशा कोणत्याही नोंदवह्या, लेखापुस्तके किंवा अन्य अभिलेख किंवा त्याचा भाग जप्त करता येईल किंवा त्यांच्या प्रती काढून घेता येतील;

(ड) त्याला योग्य वाटेल अशी आणखी माहिती प्रस्तुत करण्यास, नियोक्त्याला किंवा त्याच्या अभिकर्त्याला किंवा सेवकाला किंवा कोणत्याही कामगाराला फर्मावता येईल;

(ई) विहित करण्यात येतील असे इतर अधिकार वापरता येतील आणि अशी इतर कामे पार पाडता येतील.

(३) पोट-कलम (२) अन्वये निरीक्षकाला आवश्यक असल्याप्रमाणे, कोणत्याही नोंदवह्या, लेखापुस्तके, किंवा इतर अभिलेख त्याला सादर करणे किंवा त्याला कोणतीही माहिती देणे, हे जिच्या अधिकारात आहे अशी कोणतीही व्यक्ती तसे करण्यास कायदेशीररीत्या बांधलेली राहील.

अपराधांबद्दल शास्ती.

**१०.** (१) जो कोणी, या अधिनियमान्वये त्याने स्वतः करावयाचे कोणतेही प्रदान चुकवण्याच्या किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीला असे प्रदान चुकवण्यास मदत करण्याच्या प्रयोजनासाठी कोणतेही खोटे निवेदन किंवा खोटे अभिवेदन करील किंवा करवील किंवा कोणत्याही नोंदवहीत, लेखापुस्तकात किंवा इतर अभिलेखात खोटी नोंद करील किंवा करवील त्यास, अपराधसिद्धीनंतर, एक वर्षापर्यंत असू शकेल एवढ्या मुदतीच्या कारावासाची किंवा दोन हजार रुपयापर्यंत असू शकेल एवढ्या दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

(२) जी कोणतीही व्यक्ती या अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करील किंवा त्यांचे अनुपालन करण्यामध्ये कोणतीही कसूर करील तिला, अपराधसिद्धीनंतर, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल एवढ्या मुदतीच्या कारावासाची किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

**११.** (१) कोणतेही न्यायालय, नियंत्रक प्राधिकाऱ्याने किंवा निरीक्षकाने किंवा याबाबत राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या त्याच्या कोणत्याही अधिकाऱ्याने तक्रार केल्याशिवाय, या अधिनियमाखाली शिक्षापात्र असणाऱ्या अपराधाची दखल घेणार नाही. अपराधांची दखल घेणे.

(२) महानगर दंडाधिकाऱ्याच्या किंवा प्रथम वर्ग दंडाधिकाऱ्यांच्या न्यायालयापेक्षा कनिष्ठ दर्जाचे कोणतेही न्यायालय या अधिनियमाखालील शिक्षापात्र अशा कोणत्याही अपराधाची न्यायचौकशी करणार नाही.

**१२.** या अधिनियमास किंवा तद्न्वये केलेल्या नियमांस किंवा आदेशांस अनुलक्षून सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल नियंत्रक प्राधिकारी, कोणताही निरीक्षक किंवा अन्य कोणतीही व्यक्ती यांच्याविरुध्द कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल केली जाणार नाही. अधिनियमाखाली केलेल्या कृतीला संरक्षण.

**१३.** (१) या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनास **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, त्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींना व निर्बंधांना, कोणतेही असल्यास, अधीन राहून आणि अशा मुदतीसाठी किंवा मुदतींसाठी कोणत्याही उद्योगातील कोणत्याही विनिर्दिष्ट कारखान्याला किंवा आस्थापनेला किंवा कारखान्यांच्या किंवा आस्थापनांच्या विनिर्दिष्ट वर्गाला या अधिनियमाच्या तरतुदी लागू होणार नाहीत असा निदेश देता येईल. मात्र, अशा कारखान्यात किंवा कारखान्यांत किंवा आस्थापनेत अथवा आस्थापनांत असणारी रोजगारविषयक अधिक अनुकूल परिस्थिती किंवा अशा कारखान्याची किंवा कारखान्यांची किंवा, यथास्थिति, आस्थापनेची अथवा आस्थापनांची वित्तीय स्थिती व इतर संबद्ध परिस्थिती विचारात घेता लोकहितार्थ तसे करणे न्याय्य व योग्य होणार आहे याबद्दल शासनाची खात्री झाली पाहिजे. विशेष प्रकरणांत सूट देण्याचा अधिकार.

(२) या कलमाखालील कोणताही आदेश हा, अशा कारखान्याला किंवा कारखान्यांना किंवा यथास्थिति, आस्थापनेला अथवा आस्थापनांना हा अधिनियम ज्या तारखेस लागू झाला त्या तारखेपूर्वी नसेल अशा तारखेपासून पूर्वलक्षी प्रभावाने देता येईल.

**१४.** (१) या अधिनियमाखालील सर्व नियम करण्याचा अधिकार राज्य शासनास, पूर्व प्रसिद्धीच्या शर्तींना अधीन राहून, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे वापरता येईल. नियम करण्याचा अधिकार.

(२) या अधिनियमात अन्यत्र समाविष्ट असलेल्या नियम करण्याच्या कोणत्याही अधिकारास बाध न येता, राज्य शासनास सर्वसाधारणपणे या अधिनियमाची प्रयोजने अंमलात आणण्यासाठी नियम करता येतील. या अधिनियमात ज्यासाठी कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही अशा या अधिनियमाच्या कोणत्याही प्रयोजनासाठी फी देण्यासंबंधीची तरतूद अशा नियमांमध्ये करता येईल.

(३) या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात, एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे कबूल होतील व असा निर्णय

**शासकीय राजपत्रात** अधिसूचित करतील तर, अधिसूचनेच्या तारखेपासून, यथास्थिति, अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच नियम अंमलात येतील किंवा येणार नाहीत. तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

इतर कायदे किंवा करार यां-खालील अधि-कारांचे संरक्षण.

**१५.** या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीचा, या अधिनियमान्वये तरतूद केलेल्या गोष्टींबरोबरच राहती जागा किंवा घरभाडेभत्ता यांच्याशी संबंधित अधिक चांगल्या सेवाशर्तींसांठी कोणत्याही करारानुसार किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यानुसार, कामगारांना किंवा त्यांच्या प्रतिनिधींना मागणी करण्याचा, मिळवण्याचा किंवा औद्योगिक विवाद उपस्थित करण्याचा जो कोणताही अधिकार असेल त्यावर प्रतिकूल परिणाम होणार नाही.

---

शामुको.-एच ३५३-५,६३०-१-२०१४

**शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर**

## महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

- **संचालक**

  शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय,
  महाराष्ट्र राज्य
  (प्रकाशन शाखा) नेताजी सुभाष मार्ग, मुंबई-४०० ००४.
  दूरध्वनी : (०२२) २३६३२६९३ व ३६३०६९५

- **व्यवस्थापक**

  शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार
  फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी. पी. ओ. नजीक,
  पुणे-४११ ००१
  दूरध्वनी : (०२०) २६१२५८०८

- **व्यवस्थापक**

  शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार,
  सिव्हील लाईन्स, नागपूर-४४० ००१
  दूरध्वनी : (०७१२) २५६२६१५

- **सहा. संचालक**

  शासकीय लेखनसामग्री भांडार व ग्रंथागार, पैठण रोड,
  औरंगाबाद-४३१ ००१
  दूरध्वनी : (०२४०) २३३१५२५

- **व्यवस्थापक**

  शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
  ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६ ००३
  दूरध्वनी : (०२३१) २६५०४०२

आणि

## महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते